# उद्योजक भवरलालजी झालेत सर्वांचे 'भाऊ'

(भगवान सोनार, संपादक)



डॉ.भवरलालजी जैन यांना सारे 'भाऊ' म्हणत. भाऊंना सारेच जवळचे, लांबचे असे कोणी नाही. अजिंठ्याच्या पायथ्याशी वसलेल्या छोटयाशा खेड्यात, वाकोदमध्ये भाऊंचा जन्म व तिसरीपर्यंतचे शिक्षण झाले. पुढे जळगाव तसेच मुंबईत उच्च शिक्षण घेऊन तसेच राजपत्रित अधिकाऱ्याची परीक्षा उत्तीर्ण होऊनही त्यांनी प्रशासकीय सेवा स्वीकारली नाही. त्याऐवजी आईने दिलेल्या कृषीमंत्रातून जनजागरण घडवण्याचा निश्चय केला. त्यानुसार केलेल्या परिश्रमाला, सततच्या चिंतनाला, प्रयोगशीलतेला यश लाभले. वाकोदचे भाऊ अवघ्या जगाचे 'मोठे भाऊ' झाले, विश्वविख्यात झाले. ओळखीशिवाय भाऊंना सायकल मिळत नव्हती. ओळख देणारी एकही व्यक्ती जवळपास नसल्याने तो तरुण सुमारे १५ किलोमीटर अंतर पायी चालत गेला. तेव्हा ओळखीसाठी आसुसलेल्या या तरुणाने नंतर जिद्द आणि कष्ट करण्याच्या स्वभावामुळे अशी काही ओळख निर्माण केली की, अगदी भारताबाहेरही त्यांची ख्याती पसरली. ही व्यक्ती म्हणजे जळगावच्या जैन इरिगेशन आणि गांधीतीर्थचे संस्थापक डॉ. भवरलालजी हिरालाल जैन उर्फ मोठे भाऊ!

ठिबक सिंचन यंत्रणेचा प्रचार व प्रसार करून शेतकऱ्यांच्या जीवनात क्रांती आणणारे भाऊ म्हणजे शेतकऱ्यांमध्ये रमणारा माणूस. भाऊंनी १९७८ मध्ये एका शेती उत्पादनाच्या साहाय्यानेच आपल्या औद्योगिक कारकीर्दीचा श्रीगणेशा केला. शेतांमध्ये पपई लागवड करण्यास त्यांनी शेतकऱ्यांना प्रोत्साहित केले. त्यापासून मिळणाऱ्या 'पपई दुधास' त्यांनी हमी भावाची खात्री दिली. खरवडलेल्या विद्रूप पपयाची त्यांनी कँडी-टूटी-फ्रुटी बनविण्यासाठी खरेदी करण्यास सुरुवात केली. त्यामुळे शेतकऱ्यांना एक नवीन उत्पन्नाचा मार्ग मिळाला. पपईपासून तयार केलेले 'पपेन' तीन हजार रुपये प्रति किलो या भावाने निर्यात केले. तेच भाऊंचे पहिले शेतीवर आधारित १०० टक्के निर्याताभिमुख असे औद्योगिक साहस ठरले. शेती सिंचनासाठी पीव्हीसी पाईप लोकप्रिय करण्यासाठी त्यांनी वेगळीच शक्कल वापरली. गळतीमुळे वाया जाणाऱ्या पाण्याची तसेच बाष्पीभवनाने उडून जाणाऱ्या पाण्याची त्यामुळे बचत झाली. त्यानंतर १९८२ मध्ये तुषार आणि ठिबक सिंचनाच्या क्षेत्रात इतिहासच घडला. जगाच्या ठिबक नकाशावर भारताला क्रमांक दोनचे स्थान मिळवून देण्यात भाऊंचा सिंहाचा वाटा आहे. भाऊंनी शेतीक्षेत्राचा फार बारकाईने अभ्यास केला होता. इस्त्रायलमधील पाण्याची समस्या तेथील लोकांनी कशी सोडवली, याचाही त्यांनी अभ्यास केला. अन्नसुरक्षेसाठी पाणी हा महत्त्वाचा घटक राहणार असल्याचे लक्षात घेऊन त्यांनी प्रचलित सिंचन पध्दतीच्या उणिवा तसेच दुष्परिणाम जाणून घेतले. त्यातूनच जैन इरिगेशन सिस्टिम्स कंपनीची स्थापना करण्यात आली. या सिस्टिमचा वापर करून १९८६ मध्ये १५०० एकर क्षेत्र ठिबकखाली आणण्यात आले. पुढे १९९४ मध्ये याच क्षेत्रात दोन लाख हेक्टर्सपर्यंत वाढ झाली. त्यानंतर ठिबकचा वापर वाढतच गेला. आज हे तंत्रज्ञान शेतीसाठी वरदान ठरले आहे.

वाकोदच्या मातीत ज्वाला मिरचीचे पीक घेऊन अखिल भारतीय मिरची पीक स्पर्धेत मिळवलेल्या पारितोषिकापासून राज्य स्तरावरील, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रचंड पुरस्कारांचा प्रेरणास्त्रोत म्हणून जैन हिल्सवरील परिश्रम या इमारतीचा उल्लेख केला जातो. केवळ एवढेच नव्हे तर जळगावच्या कर्मभूमीवर साकारलेले विविध प्रकल्प, टिश्यूकल्चर लॅब, अनुभूती-१, अनुभूती-२ या वैशिष्टयपूर्ण शाळा, जैन हिल्सवरील कांताई हे कॉर्पोरेट कार्यालय हे सारे पाहण्यासारखे, समजून घेण्यासारखे आहे. उत्तुंग ध्येय, सामाजिक बांधिलकी, कठोर परिश्रम, एकाग्रता, समयसूचकता, प्रसंगावधान, आपल्या सोबत राहणाऱ्या प्रामाणिक, कार्यतत्पर सहकार्यांविषयी आपुलकी, जन्मभूमी-कर्मभूमीबाबतचा कृतीशील जिव्हाळा हे सारे गुण भाऊंच्यात एकवटले होते.

'कृषी क्षेत्रातील नवतंत्रज्ञानाबाबतची आमची स्वप्ने आपण नक्कीच पूर्ण कराल' हे स्व.आप्पासाहेब पवार आणि स्व.अण्णासाहेब शिंदे यांचे शब्द भाऊंनी सार्थ करून दाखवले. वाकोदला ठिबक सिंचन मार्गदर्शनाप्रमाणे, 'पाणी अडवा-पाणी जिरवा' असे जलसंधारणाचे अनेक प्रयोग करण्यात आले. भाऊंनी पैशाकडे साधन म्हणून पाहिले. माणूस घडावा, सकारात्मक, समाजाभिमुख व्हावा हेच त्यांचे ध्येय होते.

भारत हा खेड्यांचा देश आहे. खेडे बदलत नाही, बलशाली होत नाही तोपर्यंत भारत बलशाली होणार नाही. त्यासाठी खेड्यांकडे चला' हा महात्मा गांधींचा विचार भाऊंच्या अंतःकरणावर खोल रूजला होता. त्याप्रती ते कायम एकनिष्ठ राहिले आणि सतत ग्रामविकासाचा ध्यास घेतला. जळगावला जैन हिल्सवर साकारलेल्या गांधी रिसर्च फाऊंडेशनचे काम आंतरराष्ट्रीय स्तरावरील




